**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

U. P. G. Admission Unit
विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश विभाग

P.G. Office :- (0240) 2403123 WEBSITE : www.bamu.ac.in : http://bamua.digitaluniversity.ac E-mail : pgsection@bamu.ac.in

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया द्वितीय तात्काळ प्रवेश (स्पॉट ॲडमिशन) बाबत...

**संदर्भ:-**
१) संचालक, ताराबाई शिंदे अध्यासन केंद्र यांचे पत्र क्र. स्त्रीअकें/२०२२/२२१-२२२ दि. १२/०९/२०२२.
२) विभाग प्रमुख, मराठी विभाग यांचे कार्यालयीन पत्र २०२१-२२/निरंक दि. १२/०९/२०२२.
३) विभाग प्रमुख, संस्कृत विभाग यांचे कार्यालयीन पत्र संस्कृत वि./२०२२-२३/५० दि. १२/०९/२०२२.
४) विभाग प्रमुख, उर्दु विभाग यांचे कार्यालयीन पत्र २०२१-२०२२/१४३ दि. १२/०९/२०२२

**प्रस्तावना:-**

दिनांक १ सप्टेंबर २०२२ ते दिनांक ५ सप्टेंबर दरम्यान विद्यापीठ परिसर, औरंगाबाद, उप-परिसर, उस्मानाबाद व समाजकार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद येथील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी समुपदेशन फेरीद्वारे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली होती. तसेच रिक्त जागेसाठी दिनांक १० सप्टेंबर २०२२ रोजी तात्काळ प्रवेश फेरी (Spot Round) चे आयोजन करण्यात आले होते.

परंतु उक्त दिनांकास संपूर्ण मराठवाडयासह महाराष्ट्रातील बऱ्याच भागामध्ये अतिवृष्टी होत असल्यामुळे प्रवेशास इच्छुक अनेक विद्यार्थी हे विहित वेळेत विद्यापीठ परिसर, औरंगाबाद व उस्मानाबाद येथे पोहचू शकले नाहीत. करीता सदरील विद्यार्थी, त्यांचे पालक हे प्रवेशासाठी सतत शैक्षणिक विभागास संपर्क करीत आहेत.

तदानुषंगाने संदर्भ १ ते ४ प्रमाणे अनेक शैक्षणिक विभाग त्यांच्या विभागामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमास रिक्त जागावर पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरीता प्रवेश प्रक्रिया सुरु ठेवावी करीता पदव्युत्तर प्रवेश विभागास कळवित आहे.

करीता मा. कुलगुरु महोदय यांचे आदेशाने **दिनांक १९/०९/२०२२ रोजी द्वितीय तात्काळ प्रवेश** फेरीचे आयोजन करणेबाबत कळविले असून द्वितीय तात्काळ प्रवेश फेरीकरीता खालील वेळापत्रकाप्रमाणे तयार करण्यात आले आहे. यासोबत दिलेल्या रिक्त जागा तक्त्याप्रमाणे ज्या विभागामध्ये प्रवेशास जागा रिक्त आहेत त्या शैक्षणिक विभागामध्ये प्रवेश प्रक्रियाकरिता उपस्थित राहून प्रवेश निश्चिती करीता विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

## तात्काळ प्रवेश फेरीचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| 1 | Spot Admission round will be conducted at the concern Departments on | **19-09-2022** |
| 2 | Acceptance of Spot Round Application form | 10.30 am to 1.00 pm. |
| 3 | Scrutiny of Application and preparation of Merit list | 11.00 pm to 1.30 pm |
| 4 | Comfirm Admisison | 2.00 pm to onwards |

(कृपया मागे पहा)

सूचना, प्रवेश नियमावली:-

१. विद्यार्थ्यांनी वेळापत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित दिनांकास व विहित वेळेत संबंधित शैक्षणिक विभागात स्वखर्चाने उपस्थित रहावे. *(उप-परिसर, उस्मानाबाद येथील रिक्त जागेसाठी प्रवेशास इच्छिुक विद्यार्थ्यांस उप-परिसर, उस्मानाबाद येथे हजर राहणे बंधनकारक राहील.)*

२. शैक्षणिक विभागातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध प्रवर्गास रिक्त जागांचा अद्यावत तक्ता विद्यापीठ संकेतस्थळ www.bamu.ac.in वर दि. १३/०९/२०२२ रोजी सायंकाळी उपलब्ध करुन देण्यात येईल. कृपया संबंधित विद्यार्थी व विभागातील प्रवेश प्रक्रियेशी संबंधित प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांनी सदरील तक्याचे अवलोकन करावे.

३. प्रवेश देतांना रिक्त राहिलेल्या आरक्षणाच्या जागेवर संबंधित प्रवर्गातून आरक्षणनिहाय प्रवेश देण्यात यावा. मात्र संबंधित प्रवर्गाचा विद्यार्थी उपलब्ध नसल्यास **माहितीपुस्तिकेमध्ये पृष्ट क्र. २३ ते २५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आरक्षण रोटेशननुसार प्रवेश देण्यात यावा.**

४. पूर्वी रजिस्ट्रेशन नसलेल्या विद्यार्थ्यांचे मा. विभाग प्रमुख यांच्या ट्रॅक आयडी मध्ये दिलेल्या रजिस्ट्रेशन लिंकमध्ये विद्यार्थ्यांचे संबंधित विभागाने नोंदणी रजिस्ट्रेशन करावे व अशा विद्यार्थ्यांचे कागदपत्रे तपासून आरक्षण व गुणवत्तेनुसार रिक्त जागेवर प्रवेश द्यावा.

५. परंतु असे करतांना नवीन नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांने त्यांची उर्वरीत रजिस्ट्रेशन प्रोफाईल त्वरीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय ऑनलाईन प्रवेश व शुल्क स्विकृती शक्य होणार नाही.

६. शक्य असल्यासच शैक्षणिक विभागाने विद्यार्थ्यांला त्याची उर्वरीत ऑनलाईन प्रोफाईल पूर्ण करण्यासाठी मदत करावी.

७. शैक्षणिक विभागाने प्रवेश प्रक्रिया पूर्ण होताच प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित (कन्फर्म) करावे.

८. प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती किंवा काही अडचणी उद्भवल्यास शैक्षणिक विभागांनी पदव्युत्तर प्रवेश विभागाशी संपर्क करावा. (प्रमोद गुलगुले-९४२१४६२९०६, अभिषेक कदम-७५०७८८११५२)

९. प्रवेश प्रक्रियेमध्ये आरक्षणाबाबत काही अडचणी उद्‌भवल्यास शैक्षणिक विभागानी श्री. सतीश दवणे, समन्वयक, आरक्षण समिती (९४२३३९७६९३) यांचेशी संपर्क करावा.

१०. प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारा तात्काळ प्रवेश अर्ज, हमीपत्र आदि अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी संबंधित अर्जाच्या छायांकित प्रती सोबत आणाव्यात.

११. काही कारणास्तव विद्यार्थी तात्काळ प्रवेश अर्ज व हमीपत्र छायांकित प्रत सोबत आणू शकले नाही तर शैक्षणिक विभागांनी विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश अर्ज व हमीपत्र छायांकित प्रत पुरविण्याची व्यवस्था करावी.

विद्यापीठ परिसर, औरंगाबाद. )(
वि. प. प्र. वि./२०२२-२०२३/१८५६-१९१५ )( **उपकुलसचिव**
परिपत्रक क्र ०४ दिनांक १३-०९-२०२२ )( **विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश विभाग**

१) मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद यांना एक प्रत देण्यात येऊन विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक विभागांना सदरील परिपत्रक निदर्शनास आणून देण्यात यावे.

२) सर्व विभाग प्रमुख, सर्व शैखणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व उप-परिसर, उस्मानाबाद.

३) मा. प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

४) मा. अध्यक्ष, विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

५) संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना एक प्रत देण्यात येऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावे.

६) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव देण्यात येऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यार्थी व पालक यांचे निदर्शनास आणून देणेबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

७) श्री. सतीश दवणे, आरक्षण समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

८) मा. कुलगुरू यांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना देण्यात येऊन मा. कुलगुरू महोदय यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात यावे, ही विनंती.

९) मा. प्र-कुलगुरू यांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना देण्यात येऊन मा. कुलगुरू महोदय यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात यावे, ही विनंती.

उपकुलसचिव
विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश विभाग

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad